दै. देशोन्नती दि. 16/02/25

# गुरुद्वारा परिसरातील गोळीबार प्रकरणात दहशतवादी कनेक्शन

## गुन्ह्याचा तपास संभाजीनगर एटीएसकडे वर्ग

लोकमत न्यूज नेटवर्क



### चारचाकीतून केली होती रेकी

आरोपी हल्लेखोराने पकडल्या गेलेल्या दोघांच्या वाहनातून गुरमितसिंघ सेवादार याची रेकी केली होती. हल्ल्याच्या पूर्वी पाच दिवस अगोदरच हल्लेखोर हा नांदेडात आला होता. तो कुणा-कुणाच्या संपर्कात होता याचाही शोध सुरु आहे.

**नांदेड :** शहरातील गुरुद्वारा परिसरात १० फेब्रुवारी रोजी सकाळच्या वेळी दोघांवर गोळीबार करण्यात आला होता. या गोळीबारात एकाचा मृत्यू झाला असून अन्य एकजण जखमी आहे. गोळीबार करणाऱ्या शुटरची ओळख पटली असून या घटनेमागे दहशतवादी कनेक्शन असल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे या गुन्ह्याचा तपास छत्रपती संभाजीनगर येथील दहशतवाद विरोधी पथकाकडे देण्यात आला आहे.

१० फेब्रुवारी रोजी सकाळी साडे नऊ वाजता गुरुद्वारा परिसरात आलेल्या गुरमितसिंघ राजासिंघ सेवादार आणि त्याचा नातेवाईक रविंद्रसिंघ दयालसिंघ राठोड याच्यावर गोळीबार करण्यात आला होता.

यावेळी हल्लेखोराने आठ ते दहा गोळ्या झाडल्या होत्या. या गोळीबारात दोघेही गंभीर जखमी झाले होते. रुग्णालयात उपचार सुरु असताना रविंद्रसिंघ राठोड याचा मृत्यू झाला. तर गुरमितसिंघ सेवादार याच्यावर उपचार सुरु आहेत. घटनेनंतर हल्लेखोर हा दुचाकीवरुन पळाला होता. त्याचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना मिळाले आहेत. हल्लेखोर हा बाहेर राज्यातील असून त्याला स्थानिक काही मंडळींनी मदत केली होती.

पोलिस तपासात मनप्रितसिंघ उर्फ मन्नू गुरुबक्षसिंघ ढिल्लो आणि हरप्रितसिंघ उर्फ हॅप्पी बाबुसिंघ कारपेंटर या दोघांनी हल्लेखोराला सहकार्य केल्याचे पुढे आले. त्यामुळे पोलिसांनी या दोघांनाही अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली वाहने, मोबाईल आणि सीम कार्ड जप्त करण्यात आले आहेत. तसेच हल्लेखोराचीही ओळख पटविण्यात आली आहे.